# महावितरण
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र शासनाचा (उपक्रम)

CIN : U40109MH200SSGC153645

दुरध्वनी क्र. : २६४७४२११/२६४७२१३१
वि.क्र. ३६२४

**Website : www.mahadiscom.in**
**E-mail : dccell@mahadiscom.in**

**शिस्तभंग कारवाई कक्ष**
"प्रकाशगड", ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.


क्र. मासं/शिनि/शिस्तभंग प्रकरणे/२०१८/ - 216

दिनांक : 25 APR 2018

परिपत्रक

**विषय:- शिस्तभंग कारवाई प्रकरणामध्ये जावक क्रमांक नोंदविण्याच्या पध्दतीबाबत.**

---------

सद्यस्थितीत शिस्तभंग प्रकरणात सक्षम अधिकाऱ्यांची आरोपपत्र/पत्र/कारणे दाखवा नोटीस/शिक्षा आदेश यांच्यावर स्वाक्षरी झाल्यानंतरच एचआरएमएस प्रणालीमध्ये त्याची नोंद होऊन त्या पत्रावर HRMS मधील क्रमांक हस्ताक्षरात नोंदविला जातो व सदर पत्र निर्गमित केले जाते.

तथापि, दि. २१/०३/२०१८ रोजी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी घेतलेल्या मानव संसाधन विभागाच्या आढावा बैठकीमध्ये सदर कार्यपध्दतीबाबत नाराजी व्यक्त केली. शिस्तभंग प्रकरणाशी संबंधित प्रत्येक पत्रावरील एचआरएमएसमधील क्रमांक हा छापील असावा व छापील क्रमांक असलेले प्रकरणच पुढील कारवाईसाठी वैध समजण्यात यावे असे निर्देश त्यांनी दिले आहेत. त्याअनुषंगाने प्रचलित पध्दतीमध्ये पुढील बदल करण्याबाबत निर्देशित करण्यात येत आहे.

- प्रत्येक शिस्तभंग प्रकरणी कसुरदार कर्मचाऱ्यांला द्यावयाच्या पत्र/आरोपपत्र/कारणे दाखवा नोटीस/शिक्षा आदेश इत्यादीचा मसुदा संबंधित मानव संसाधन विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांनी सक्षम अधिकाऱ्यांकडून संमत करुन घ्यावा.
- त्यानंतर एचआरएमएसमध्ये सदर प्रकरणाची नोंद करुन एचआरएमएसद्वारे मिळालेल्या क्रमांकाची व जावक क्रमांकाची नोंद सदर पत्रावर छापून घेण्यात यावी व सदर पत्र सक्षम अधिकाऱ्यांकडून स्वाक्षरी करुन घ्यावे.
- सर्व सक्षम अधिकाऱ्यांना सूचीत करण्यात यावे की, शिस्तभंग कारवाईशी संबंधित अंतिम पत्र स्वाक्षरी करण्यापूर्वी त्यावर छापील एचआरएमएस प्रणालीचा क्रमांक व जावक क्रमांक नोंदविला आहे याबाबत त्यांनी खातरजमा करावी.
- सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी झाल्यावर शिस्तभंग कारवाईच्या अनुषंगाने देण्यात येणारे प्रत्येक पत्र एचआरएमएस प्रणालीमध्ये दिलेल्या ठिकाणी स्कॅन करुन Upload करावे. असे केल्यानंतर सदर पत्राची प्रत कोणत्याच कार्यालयास पाठविण्याची गरज नाही. त्याचप्रमाणे निर्देशित केल्यापमाणे पत्र एचआरएमएस प्रणालीत Upload केले नाही तर सदर प्रकरणात पुढील कार्यवाही एचआरएमएस प्रणालीतून होणार नाही याची नोंद घेण्यात यावी.
- शिस्तभंग कारवाई प्रकरणातील संबंधित पत्र व्यवहार छापील एचआरएमएस प्रणालीचा नोंदणी क्रमांक व जावक क्रमांक नसल्यास सदर प्रकरणे रद्दबादल ठरतील व त्याची जबाबदारी संबंधित सक्षम अधिकाऱ्यांची राहील.

सबब, उपरोक्त नमूद पध्दती तातडीने अंमलात आणली जावी असे निर्देश देण्यात येत आहे.

सदरचे परिपत्रक कंपनीच्या **R-APRDRP Portal** वर उपलब्ध करण्यात आले आहे.

२५/४

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)